बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनिमय २०१५ व सुधारीत २०२१ अंतर्गत बालकांची काळजी व संरक्षण घेणाऱ्या जिल्हा परिविक्षा व अनुरक्षण संघटना संचलित मुलांचे निरीक्षणगृह / बालगृह लेबर कॉलनी लातूर जि. लातूर संस्थेच्या स्थलांतरणास मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक- बालगृ-२०२६/ प्र.क्र. १६० /का-८
नविन प्रशासन भवन, तिसरा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक- ३१ ऑगस्ट, २०२६

<u>वाचा</u> :-

१. महाराष्ट्र राज्य बाल न्याय (मुलांची व संरक्षण) अधिनियम २०१५ व सुधारीत २०२१
२. महाराष्ट्र राज्य बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम २०१८
३. महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्र.बालगृ-२०२४/प्र.क्र.७१/का-८ दि. १०.१०.२०२४
४. महिला व बाल विकास आयुक्तालयाचे पत्र क्र. मबाविआ/बावि/का-५/स्थलांतरण /२०२६-२७/४४०५, पुणे दि. ५.८.२०२६

<u>प्रस्तावना</u> :-

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ व सुधारीत २०२१ अन्वये काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या ० ते १८ वर्षे वयोगटातील अनाथ, निराधार, निराश्रीत, विशेष काळजीची गरज असलेले व एच.आय.व्ही / एड्स बाधित, संकटग्रस्त व अत्याचारीत अशा काळजीची व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांना पोलीस, स्वयंसेवी संस्था, पालक यांचेकडून संबंधित बाल कल्याण समितीपुढे सादर केले जाते आणि त्यांच्या आदेशानुसार या बालकांना मान्यताप्राप्त बालगृहामध्ये दाखल करण्यात येते. बालकांना संस्थेतील वास्तव्याच्या कालावधीमध्ये अन्न, वस्त्र, निवारा, वैद्यकीय मदत, मनोरंजन, शिक्षण व प्रशिक्षणाच्या सुविधा पुरवून त्यांचे पुनर्वसन करण्याचा प्रयत्न केला जातो.

२. बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ मधील कलम ४१ मध्ये बालकांची काळजी घेणाऱ्या निवासी संस्थांना राज्य शासनाकडून नोंदणी प्रमाणपत्र असणे बंधनकारक करण्यात आले आहे. सदर नोंदणी प्रमाणपत्राचा वैधता कालावधी ५ वर्षे इतका करण्यात आलेला आहे. तथापि, बालकांची काळजी घेणाऱ्या ज्या स्वयंसेवी संस्थांकडून अधिनियम/नियम, शासनाने विहीत केलेल्या अटी व शर्ती, ध्येय धोरण यांचे उल्लंघन होते, अशा

संस्थांची मान्यता रद्द करण्याची कार्यवाही केली जाते. तसेच काही स्वयंसेवी संस्थाचालकांना काही अपरिहार्य कारणास्तव संस्था चालविणे शक्य होत नाही त्यांची संस्था बंद करण्यात येते. संस्था बंद केल्याने / मान्यता रद्द केल्याने त्या जिल्ह्यातील मंजूर क्षमता कमी होते. जिल्ह्यातील मंजूर क्षमता कायम ठेवण्याच्या उद्देशाने सद्यस्थितीत चालू असलेल्या बालकांची काळजी घेणाऱ्या संस्था चालविण्यास मातृ संस्था असमर्थ असल्याने अशा बालकांची काळजी घेणाऱ्या संस्था इतर मातृ संस्थेस हस्तांतरीत करण्याबाबत ठराव पारित केलेल्या सर्व संस्था इतर मातृ संस्थांना हस्तांतरीत करण्याच्या अनुषंगाने तसेच सुधारित बाल न्याय अधिनियम आणि नियम यांना अनुसरुन संस्थांच्या स्थलांतरणासाठी शासनाच्या दि. १०.१०.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये एकत्रितपणे “स्वयंसेवी संस्थांचे हस्तांतरण / स्थलांतरण धोरण” निश्चित करण्यात आले आहे.

३. शासन निर्णय दि. १०.१०.२०२४ नुसार बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ व सुधारीत २०२१ अंतर्गत बालकांची काळजी व संरक्षण घेणारी जिल्हा परिविक्षा व अनुरक्षण संघटना संचलित मुलांचे निरीक्षणगृह / बालगृह लेबर कॉलनी लातूर जि. लातूर ही संस्था श्री शिवाजी लांडगे इमारत, सर्वे नं /गट नं १२१/१ प्लॉट नं ४, हरंगुळ बु. ता. जि. लातूर या ठिकाणी स्थलांतरणास जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, लातूर तसेच विभागीय उपायुक्त, महिला व बाल विकास छत्रपती संभाजीनगर तसेच आयुक्त, महिला व बाल विकास पुणे यांनी शिफारस केली असल्याने सदर संस्थेच्या स्थलांतरणास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u> :-

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ चे कलम ४१ आणि महाराष्ट्र राज्य बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम २०१८ मधील तरतुदीनसार जिल्हा परिविक्षा व अनुरक्षण संघटना संचलित मुलांचे निरीक्षणगृह / बालगृह लेबर कॉलनी लातूर जि. लातूर या संस्थेस ५ वर्षाच्या कालावधीकरीता दि. ६.५.२०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये नोंदणी प्रमाणपत्रास मान्यता दिलेली आहे. उपरोक्त संस्थेच्या स्थलांतरणास मान्यता प्रदान केल्यानंतर संस्थेच्या स्थलांतरणाच्या सुधारीत ठिकाणचा व संस्थेचा उल्लेख करुन सदर संस्थेस नव्याने नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक आहे. सबब, सदर संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्याच्या व संस्थेस शासनाने स्थलांतरणास मान्यता दिल्यानंतर एक महिन्याच्या आत बालगृहाचे स्थलांतर करण्यापुर्वी शासनाच्या बालनिधीत रु.१,००,०००/- इतका निधी जमा करण्याच्या अटींच्या अधिन राहून व संस्थेच्या स्थलांतरीत जागेच्या भाडयाची जबाबदारी संबंधित संस्थेची राहील.संस्थेने त्यांना देय असलेल्या अनुदानातून सदर भाडे भागविण्यात यावे. संस्थेस वेगळयाने नवीन भाडयाची मागणी करता येणार नाही. या अटीच्या अधिन राहून खालीलप्रमाणे स्वयंसेवी संस्थेच्या स्थलांतरणास शासन मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	संस्थेचे नाव व ठिकाण	स्थलांतरणानंतर संस्थेचे नाव ठिकाण	संस्थेचा प्रकार व प्रवेशितांची संख्या
१	जिल्हा परिविक्षा व अनुरक्षण संघटना संचलित मुलांचे निरीक्षणगृह / बालगृह लेबर कॉलनी लातूर जि. लातूर	जिल्हा परिविक्षा व अनुरक्षण संघटना संचलित मुलांचे निरीक्षणगृह / बालगृह, श्री शिवाजी लांडगे इमारत, सर्वे नं / गट नं १२१/१, प्लॉट नं ४, हरंगुळ बु. ता. जि. लातूर	निरीक्षणगृह १५ मुले बालगृह ३५ मुले एकुण ५० मुले

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२६०८३११२०१०७५१३० असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

NILESH JANARDAN PATIL

Digitally signed by NILESH JANARDAN PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=WOMEN AND CHILD DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=b7f57a5d2af23fdb37cfec3c30cfe085ddbef06ea381e7e81401a472bbb966f7, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=B7D8429F943427129A6A081EE223FEAC961CDD926C4D3542C55A470F22A7C7AE, cn=NILESH JANARDAN PATIL
Date: 2026.08.31 12:01:59 +05'30'

(डॉ.निलेश ज. पाटील)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई,
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा.अध्यक्ष/उपाध्यक्ष विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई,
४. मा.सभापती/उपसभापती विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई,
५. मा. विरोधी पक्ष नेता, विधानसभा/विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ,मुंबई,
६. मा.मंत्री /मा. राज्यमंत्री (म. व बा. वि.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
७. प्रधान सचिव (व्यय), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
८. प्रधान सचिव (ले. व को.), वित्त विभाग,मंत्रालय ,मुंबई,
९. आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,
१०.महालेखापाल, १/२ (लेखा व अनुज्ञेयता) / (लेखा परीक्षा), मुंबई / नागपूर,
११. विभागीय उपायुक्त, महिला व बाल विकास, छत्रपती संभाजीनगर
१२. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, लातूर
१३. बाल कल्याण समिती अध्यक्ष व सदस्य, लातूर
१४. बाल न्याय मंडळ अध्यक्ष व सदस्य, लातूर
१५.संबंधित संस्था (आयुक्त, महिला व बाल विकास पुणे यांच्यामार्फत)
१६. निवडनस्ती का-८